# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४

## विद्युत अधिनियम, २००३

क्रमांक मविनिआ/लिगल/१११/२००४/१०९१ - विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) मधील कलम १८१ च्या उप-कलम (२) चा खंड (b) सह कलम १५ चे उप-कलम (१), कलम १८१ च्या उप-कलम (२) चा खंड (c) सह कलम (१५) चे उप-कलम (२), कलम १८१ च्या उप-कलम (२) चा खंड (d) सह कलम १६, कलम १८१ च्या उप-कलम (२) चा खंड (e) सह कलम १८च्या उप-कलम (२) चा खंड (a) आणि कलम १८१च्या उप-कलम (२) चा खंड (f) सह कलम १८च्या उप-कलम (२) चा खंड (c), कलम १८१ च्या उप-कलम (२) चा खंड (z) सह कलम ५२ आणि कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (zp) अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, याद्वारे खालील विनियम करीत आहे.

**प्रकरण १: सर्वसाधारण**

**१ संक्षिप्त नांव, व्याप्ती व प्रारंभ**

(१) या विनियमांस "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ " असे म्हणावे.

(२) हे विनियम सबंध महाराष्ट्र राज्यास लागू राहतील.

(३ ) हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापसून अंमलात येतील.

**२. विनियम कोणाला लागू असतील**

हे विनियम प्रसिध्द होण्याच्या तारखेस आयोगापुढे परवान्यांसाठी प्रलंबीत असलेल्या अर्जांसह सर्व अर्जांना आणि अधिनियमाखालील सर्व परवान्यांना हे विनियम लागू राहतील.

**३. व्याख्या**

या विनियमांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर -

अ) **"लेखा विवरणपत्र"** म्हणजे परवानाप्राप्त उद्योगांकरिता प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता स्वतंत्र तयार केलेली व खालील बाबींचा समावेश असलेली लेखा विवरणपत्रे -

(१) कंपनी अधिनियम, १९५६ च्या अनुसूची ६ च्या भाग १ मधील नमुन्याप्रमाणे तयार केलेला ताळे-बंद;

(२) कंपनी अधिनियम, १९५६ च्या अनुसूची ६ च्या भाग २ मधील गरजांची पुर्तता करुन तयार केलेले नफा-तोटा पत्रक;

(३) भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या रोकड आवक (cash flow) विवरणपत्रासाठी असलेल्या लेखा प्रमाणांवर (AS-3) आधारित तयार केलेले रोकड आवक विवरणपत्र;

(४) वीज व्यापा-याच्या वैधानिक लेखापरिक्षकाचा अहवाल;

(५) कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम २०९(१)(डी) खाली केंद्र शासनाने विहीत केलेले खर्चाचे अभिलेखे.

यांसह त्यासंबधीच्या टिपण्या, व आयोग वेळोवळी निदेश देईल त्यानुसार इतर सहाय्यक विवरणपत्रे व माहिती.

(ब) **“अधिनियम”** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);

(क) **“अर्जदार”** म्हणजे अधिनियमाखाली आणि या विनियमांना अनुसरुन विजेचा व्यापार करण्याकरिता परवाना प्राप्तीसाठी ज्याने अर्ज केला आहे अशी व्यक्ति;

(ड) **“मंडळ”** म्हणजे विद्युत पुरवठा अधिनियम, १९४८ (१९४८ चा ५४) च्या कलम ५ मधील उप-कलम (१) खाली घटीत करण्यांत आलेले महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ;

(इ) **“आयोग”** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

(फ) **“कामकाज चालविणे विनियम”** म्हणजे अधिनियमाच्या कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (z) सह कलम ९२ च्या उप-कलम (१) नुसार विनिर्दिष्ट करण्यांत आलेले विनियम;

(ग) **“परवाना”** म्हणजे विजेचा व्यापार करण्यासाठी अधिनियमाच्या कलम १४ खाली देण्यांत आलेला परवाना;

(ह) **“परवानाप्राप्त उद्योग”** म्हणजे अधिनियमाच्या कलम १४ खाली देण्यांत आलेल्या परवान्यानुसार विजेचा व्यापार करण्याचा उद्योग;

(ई) **“निव्वळ मत्ता”** म्हणजे व्यक्ति किंवा व्यक्तींच्या संघटनेच्या संदर्भात, रोकड, बँकेतील शिल्लक, आणि सूचीबध्द रोख्यांत (listed securities) केलेल्या गुंतवणुकीची बाजारातील किंमत यांच्या बेरजेतून इतर व्यक्तीला देय असलेली कर्जे व दायित्त्वे (liabilities) वजा केल्यावर उरलेली शिल्लक आणि, इतर कौणत्याही व्यक्तीच्या

संदर्भात, भरणा केलेले एकूण भाग-भांडवल, भाग अधिमूल्य आणि लाभांश म्हणून वाटप करण्यासाठी पात्र  असलेला राखीव निधी यांची बेरीज;

(ज) **"अधिकारी"** म्हणजे आयोगाचा अधिकारी;

(त ) **"सचिव"** म्हणजे आयोगाचा सचिव.

यांत वापरलेले आणि व्याख्या न केलेले शब्द किंवा शब्दप्रयोग त्यांना अधिनियमांत नमूद केल्यानुसार अर्थ राहील.

## प्रकरण २: कार्यपध्दतीविषयक बाबी

### ४. परवाना मिळण्यासाठी करावयाचा अर्ज

४.१ परवाना प्राप्तीसाठी करावयाचा अर्ज अनुसूची १ मध्ये विहीत करण्यांत आलेल्या नमुन्यामध्ये आणि कागदपत्रे व माहितीसह करण्यांत येईल.

४.२ वरील विनियम ४.१ खालील अर्ज, अधिनियमाच्या कलम १५ च्या उप-कलम (१) मध्ये विहीत करण्यांत आलेल्या शुल्कासह, करण्यांत येईल.

४.३ वरील विनियम ४.१ खालील अर्ज, अर्जदाराकडून स्वाक्षरी करण्यांत येईल आणि सचिवाकडे पाठविण्यात येईल आणि तो कामकाज चालविण्याच्या विनियमांमध्ये याचिका सादर करण्यासाठी घालून दिलेल्या पध्दतीनुसार सादर करण्यांत येईल.

### ५. पात्रता

५.१ परवाना प्राप्तीसाठी अर्ज करताना अर्जदार खाली नमूद केलेल्या पात्रता निकषांची पूर्तता करेल.

परंतु असे की, अधिनियमाच्या कलम १४ च्या पहिल्या, दुस-या, तिस-या, चवथ्या आणि पांचव्या परंतुकाखाली उल्लेखलेल्या परवानेधारकांना पात्रता निकष लागू राहणार नाहीत.

५.२ अर्जदाराकडे खालील पैकी प्रत्येक शाखेचा अनुभव असलेला कमीत कमी एक पूर्णवेळ व्यावसायिक असेल -

(अ) वीज यंत्रणा चालविणे आणि विजेच्या हस्तांतरणाची व्यापारी बाजू;

(ब) अर्थ, वाणिज्य आणि लेखा.

परंतु असे की, आयोगाने जरी परवाना दिला असला तरी, परवानाप्राप्त उद्योग सुरु करण्यापूर्वी तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता पूर्ण करण्यांत येईल.

५.३ परवानाप्राप्त उद्योग सुरु करण्यापूर्वी अर्जदाराने पूर्णवेळ तत्वावर नेमलेल्या व्यावसायिक आणि सहाय्यक कर्मचा-यांचा तपशील अर्जदार आयोगास सादर करेल.

५.४ अर्जदाराची निव्वळ मत्ता खाली विनिर्दिष्ट केलेल्या रकमांपेक्षा कमी असणार नाही:

| **अनुक्रमांक** | **परवान्याची वर्गवारी** | **प्रस्तावित वार्षिक विजेच्या व्यापाराचे परिमाण (kwh मध्ये)** | **निव्वळ मत्ता (रु. कोटीत)** |
|---|---|---|---|
| १ | अ | १०० दशलक्ष पर्यंत | १.५० |
| २ | ब | १०० ते २०० दशलक्ष | ३.० |
| ३ | क | २०० ते ५०० दशलक्ष | ७.५ |
| ४ | ड | ५०० ते ७०० दशलक्ष | १०.० |
| ५ | ई | ७०० ते १००० दशलक्ष | १५.० |
| ६ | फ | १००० दशलक्षाच्या वर | २०.० |

## ६. अर्जाची छानननी

६.१ आयोग किंवा सचिव किंवा आयोगाने त्याप्रित्यर्थ पदनिर्देशीत केलेला कोणताही अधिकारी, अर्जाची छाननी केल्यानंतर आणि जेथवर व्यवहार्य असेल तेथवर, अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस (३०) दिवसांच्या आंत, अर्जाचा विचार करण्यासाठी आवश्यक वाटणारी अतिरिक्त माहिती किंवा तपशील किंवा कागदपत्रे, अर्जदारास सादर करण्यास भाग पाडू शकेल.

६.२ अर्ज पूर्ण झाल्यावर आणि त्यास सर्व आवश्यक ती माहिती, तपशील व कागदपत्रे जोडण्यांत आल्यावर आणि अर्जाद्वारे सर्व अटींची पूर्तता झाल्यावर, आयोग किंवा सचिव किंवा आयोगाने त्याप्रित्यर्थ पदनिर्देशीत केलेला कोणताही अधिकारी, अधिनियमांत आणि लागू असणा-या विनियमांत तरतूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार विचार करण्यासाठी अर्ज तयार असल्याचे अर्जदारास कळवेल.

## ७. परवाना मिळण्यासाठी अर्जाची नोटीस

७.१ अर्जदार परवाना मिळण्यासाठी त्याच्या अर्जाबाबतची नोटीस, प्रस्तावित व्यापाराच्या क्षेत्रांतील इंग्रजी भाषेतील कमीत कमी दोन (२) वर्तमानपत्रांत आणि दोन (२) मराठी भाषेतील वर्तमानपत्रांत प्रसिध्द करेल.

७.२ अधिनियमांतील कलम १५ च्या उप-कलम (२) नुसार अर्जाच्या नोटिशीमध्ये खालील बाबींचा तपशील असेल:

(अ) अर्जदाराचे नांव व नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता;

(ब) अर्ज केलेल्या परवान्याचे स्वरुप व अर्जाची ठळक वैशिष्ट्ये;

(क) अर्जदाराचा कायदेशीर दर्जा, धारण केलेले भाग, व्यवस्थापनाची माहिती, कामकाजाचा गोषवारा आणि अशाच प्रकारच्या कामातील मागील अनुभव;

(ड) प्रस्तावित व्यापाराचे क्षेत्र;

(इ) प्रस्तावित व्यापाराचे परिमाण;

(फ) संबंधित मुख्य शहरातील / नगरांतील अर्जदाराच्या नियंत्रणाखालील व्यक्तिचे (व्यक्तींची) नांवे, पत्ते व इतर आवश्यक तपशील, ज्यांच्याबरोबर अर्जाची आणि इतर कागदपत्रांची तपासणी करता येईल किंवा ज्यांच्याकडून ती, फोटोकॉपी करण्यासाठी येणा-या खर्चापेक्षा जास्त नसेल इतकी रास्त किंमत देऊन, व्यक्तिशः किंवा पोस्टाद्वारे खरेदी करता येतील, आणि अर्जदाराच्या वेब-साइटचा पत्ता जेथून अर्ज आवश्यक त्या इतर कागदपत्रांसह विनामूल्य उतरवून (download) घेता येईल.

(ग) आयोगाकडे केलेल्या अर्जाच्या संदर्भात कोणतीही हरकत घेण्यास इच्छयुक असणारी कोणीही व्यक्ति, अधिनियमाच्या कलम १५ च्या उप-कलम (२) च्या खंड (i) मध्ये करण्यांत आलेल्या तरतूदीत विहीत केलेल्या काल-मर्यादेत, त्यासाठी सचिवाला एक लेखी सूचना (सहा प्रतीत) पाठवू शकेल, याबाबतचे निवेदन.

परंतु असे की, अर्ज प्राप्त झाल्यापसून चार (४) दिवसांच्या आंत, प्रकरणाची विशिष्ट परिस्थिती लक्षांत घेऊन आयोगास उचित वाटेल असा अतिरिक्त तपशील नोटिशीत समाविष्ट करण्यास आयोग सांगू शकेल.

## ८. परवान्यांतील सुधारणेबाबत नोटीस

८.१ अधिनियमाच्या कलम १८ च्या उप-कलम (२) च्या खंड (a) नुसार व्यापाराच्या क्षेत्रांतील इंग्रजी भाषेतील कमीत कमी दोन (२) वर्तमानपत्रांत आणि दोन (२) मराठी भाषेतील वर्तमानपत्रांत एक नोटीस प्रसिध्द करण्यांत येईल.

८.२ अर्जांत बदल किंवा सुधारणा करण्यासाठी केलेल्या अर्जाच्या दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आंत नोटीस प्रसिध्द करण्यांत येईल व त्यांत खालील तपशील असेल :

(अ) वीज व्यापा-याचे नांव व व्यापाराच्या क्षेत्रांतील मूख्य कार्यालयाचा पत्ता;

(ब) आयोगाकडे करण्यांत आलेल्या अर्जातील बदल किंवा सुधारणांचा तपशील;

(क) प्रस्तावित बदल किंवा सुधारणांची तर्कसंगत कारणमिमांसा व त्यामुळे बाधित होण्याची शक्यता असणा-या व्यक्ती;

(ड) संबंधित मुख्य शहरातील / नगरांतील वीज व्यापा-याच्या हाताखाली काम करणा-या व्यक्तिचे (व्यक्तींची) नांवे, पत्ते व इतर आवश्यक तपशील, ज्यांच्याबरोबर अर्जाची आणि इतर कागदपत्रांची तपासणी करता येईल किंवा ज्यांच्याकडून ती, फोटोकॉपी करण्यासाठी येणा-या खर्चापेक्षा जास्त नसेल इतक्या रास्त किंमतीत, व्यक्तिशः किंवा पोस्टाद्वारे खरेदी करता येईल, आणि वीज व्यापा-याच्या वेब-साइटचा पत्ता जेथून अर्ज आवश्यक त्या इतर कागदपत्रांसह विनामूल्य उतरवून (download) घेता येईल.

(इ) आयोगाकडे केलेल्या अर्जाच्या संदर्भात कोणतीही सूचना करण्यास किंवा हरकत घेण्यास इच्छयुक असणारी कोणीही व्यक्ति, अधिनियमाच्या कलम १८ च्या उप-कलम (२) च्या खंड (d) मध्ये करण्यांत आलेल्या तरतूदीत विहीत केलेल्या काल-मर्यादेत, त्यासाठी सचिवाला एक लेखी सूचना (सहा प्रतीत) पाठवू शकेल, याबाबतचे निवेदन.

परंतु असे की, अर्ज प्राप्त झाल्यापसून चार (४) दिवसांच्या आंत, प्रकरणाची विशिष्ट परिस्थिती लक्षांत घेऊन आयोगास उचित वाटेल असा अतिरिक्त तपशील नोटिशीत समाविष्ट करण्यास आयोग सांगू शकेल.

८.३ अधिनियमाच्या कलम १८ च्या उप-कलम (२) च्या खंड (c) नुसार द्यावयाच्या नोटीशीत खालील तपशील असेल :

(अ) वीज व्यापा-याचे नांव आणि व्यापाराच्या क्षेत्रातील मुख्य कार्यालयाचा पत्ता;

(ब) आयोगाने करावयाच्या प्रस्तावित बदल किंवा सुधारणेचे स्वरुप;

(क) प्रस्तावित बदल किंवा सुधारणाची तर्कसंगत कारणमिमांसा व त्यामुळे बाधित होण्याची शक्याता असणा-या व्यक्ती;

(ड) आयोगाकडे केलेल्या अर्जाच्या संदर्भात कोणतीही सूचना करण्यास किंवा हरकत घेण्यास इच्छयुक असणारी कोणीही व्यक्ति, अधिनियमाच्या कलम १८ च्या उप-कलम (२) च्या खंड (d) मध्ये करण्यांत आलेल्या तरतूदीत विहीत केलेल्या काल-मर्यादेत, सचिवाला एक लेखी सूचना (सहा प्रतीत) पाठवू शकेल, याबाबतचे निवेदन.

## ९. अर्जावरील प्रक्रिया

या विनियमांखाली करण्यातं आलेल्या अर्जावर प्रक्रिया करतांना कामकाज चालविणे विनियमांत घालून देण्यांत आलेली कार्यपध्दती आयोग अवलंबेल.

## १०.  परवान्याचा नमूना

अधिनियमाच्या कलम १५ च्या उप-कलम (६) च्या खंड (a) खाली देण्यांत आलेला परवाना या विनियमांच्या अनुसूची २ मध्ये विहीत करण्यांत आलेल्या नमुन्याप्रमाणे असेल.

परंतु असे की, परवान्यासाठी विहीत करण्यांत आलेल्या नमुन्यामध्ये आयोग त्यास स्वमते आवश्यक वाटेल अशी भर घालू शकेल अथवा बदल किंवा सुधारणा करु शकेल .

## ११.  छापील प्रती देणे

११.१ ज्या व्यक्तीस परवाना देण्यात आला आहे अशी व्यक्ति परवाना दिल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आंत अशा परवान्याची एक प्रत व्यापराच्या क्षेत्रात असलेल्या त्याच्या प्रधान कार्यालयांत तपासणीसाठी जनतेस कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन देईल.

११.२ परवाना दिल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आंत, असा प्रत्येक परवानाधारक, फोटोकॉपीपेक्षा जास्त खर्च येणार नाही इतक्या रास्त किंमतीस, परवान्याच्या छापील प्रती विक्रीकरिता उपलब्ध करुन देईल.

## १२.  मानीव परवानेधारक

अधिनियमाच्या भाग १३ नुसार राज्य शासनाने जर हस्तांतरण योजना प्रसिध्द केली असेल तर अशा हस्तांतरण योजनेद्वारे मालमत्ता, मालमत्तेत स्वारस्य, हक्क व जबाबदा-या सोपविलेल्या शासकीय कंपनी किंवा कंपनीस या विनियमांत परवाना मिळण्यासाठी नमूद केलेल्या कार्यपध्दतीचे पालन करण्याची गरज राहणार नाही.

# प्रकरण ३:  परवान्याच्या अटी व शर्ती

## १३  सर्वसाधारण

१३.१ प्रत्येक वीज व्यापारी या विनियमांतील अनुसूची २ मधील परवान्याच्या सर्वसाधारण आणि विषिष्ट अटींच्या, अधीन राहील

१३.२ एका  परवान्यास किंवा  परवान्यांच्या एका वर्गास लागू करण्यासाठी  आयोग कोणत्याही इतर विशिष्ट अटी विनिर्दिष्ट करु शकेल आणि अशा अटी या अशा परवान्याच्या अटी म्हणून मानण्यांत येतील.

परंतु असे की, अशा अतिरिक्त अटी विनिर्दिष्ट करण्यपूर्वी आयोग अशा अतिरिक्त अटींच्या संदर्भांत मते मांडण्यासाठी वाजवी संधी देईल.

## १४. वीज व्यापाराचे क्षेत्र

परवान्यांत नमुद केलेले क्षेत्र हे वीज व्यापा-याच्या वीजेच्या व्यापाराचे क्षेत्र असेल.

## १५. परवान्याचा प्रारंभ व कालावधी

अधिनियमाखाली आणि या विनियमांना अनुसरून देण्यांत आलेला परवाना त्यांत नमूद केलेल्या तारखेपासून अंमलांत येईल आणि अधिनियमाच्या कलम १९ मधील तरतूदींना अनुसरून आयोगाने जर तो आधीच रद्द केला नाही तर तो अधिनियमाच्या कलम १५ च्या उप-कलम (८) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपर्यंत अंमलांत राहील.

## १६. कर्तव्ये

१६.१ वीज व्यापा-याला खालील जबाबदा-या पार पाडाव्या लागतील -

(अ) वीज व्यापारी विजेच्या पारेषणाचा व्यापार करणार नाही.

(ब) अंमलांत असलेल्या व लागू असलेल्या कायद्यातील तरतूदींची व विशेषतः अधिनियमाची आणि त्याखालील नियम व विनियमांची, राज्य ग्रिड संहिता, आयोगाने वेळोवळी दिलेले आदेश आणि निदेश यांची वीज व्यापारी पूर्तता करेल.

(क) वीज व्यापरी जेव्हा त्याच्या व्यापाराचे परिमाण खालच्या वर्गवारीतून वरच्या वर्गवारीत जाईल तेव्हा त्याची निव्वळ मत्ता तो वाढवेल आणि वर्गवारीतील बदल प्रत्येक वर्षी ३१ मार्च रोजी संपणा-या वर्षांत व्यापा-याने केलेल्या विजेच्या व्यापाराच्या परिमाणाच्या आधारावर ठरविण्यांत येईल आणि वीज व्यापारी एका वर्गवारीतून दुस-या वर्गवारीत जाताना आणि त्या अनुषंगाने त्याच्या निव्वळ मत्तेमधील बदल आयोगास कळवेल.

(ड) आयोगाने जेथे व्यापाराचे मार्जिन निश्चित केले असेल तेथे वीज व्यापा-यास त्याच्या अधीन रहावे लागेल.

(इ) आयोग विहीत करेल त्या तांत्रिक बाबी, पुरेशा भांडवलाबाबतच्या अटी व पत-पात्रता यांचे नियंत्रण वीज व्यापा-यावर राहील आणि जेव्हा व्यापाराचे परिमाण वाढेल तेव्हा तो तांत्रिक आणि कर्मचारीवर्गासह पुरेशा भांडवलाबाबतच्या वाढत्या गरजा पु-या करेल.

(फ) दूरध्वनी, फॅक्स, संगणक, इंटरनेट यासारख्या संपर्क सुविधा व्यापारास सुरुवात करण्यापूर्वी वीज व्यापारी बसवेल.

(ग) प्रादेशिक विद्युत मंडळे किंवा प्रादेशिक उर्जा समित्या, जसे असेल तसे, राज्य लोड डिस्पॅच सेंटर आणि राज्य पारेषण कंपनी यांच्याशी परवानाप्राप्त उद्योगाच्या संदर्भात वीज व्यापारी सुसूत्रता साधेल.

(ह) आयोग प्राधिकृत कोणत्याही व्यक्तीला परवान्याच्या संदर्भात त्याचे कर्तव्य पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य वीज व्यापारी देईल.

(ई) व्यापाराचे सर्व व्यवहार पत-पत्रांद्वारे किंवा व्यापारांत ग्राह्य ठरलेल्या इतर माध्यमांद्वारे करण्यांत येतील.

(ज) वीज व्यापारी, परवानाप्राप्त उद्योग लागोपाठच्या चार तिमाह्या चालविण्याचे टाळणार नाही किंवा त्यांत निष्काळजीपणा करणार नाही.

(त) वीज व्यापारी त्याच्या ग्राहकांची आणि त्याने इतर व्यक्तींबरोबर केलेल्या व्यवहारांची अद्ययावत नोंद ठेवेल.

१६.२ वीज व्यापारी, जितके व्यवहार्य असेल तितके लवकर, आयोगास कळवेल -

(अ) अधिनियम, त्याखालील नियम आणि विनियम, आयोगाने दिलेले निदेश किंवा आदेश, करार किंवा परवाना यानुसार वीज व्यापा-यावर येणा-या जबाबदा-या पार पाडण्याच्या त्याच्या क्षमतेवर परिणाम करेल असा परिस्थितीतील कोणताही लक्षणीय बदल;

(ब) अधिनियम, त्याखालील नियम आणि विनियम, आयोगाने दिलेले निदेश किंवा आदेश, करार किंवा परवाना यांचा कोणताही महत्वाचा भंग, किंवा त्याची संभाव्य शक्यता, जी त्यास पुरेशी माहित होती, व्यवहार्य असेल तितके लवकर, त्याबाबतच्या कारणांसह; आणि

(क) व्यवस्थापकीय नियंत्राणांतील कोणताही बदल किंवा वीज व्यापा-याच्या भाग-धारणेतील महत्वाचा बदल.

खुलासा १ : या विनियमांच्या प्रयोजनार्थ, “व्यवस्थापकीय नियंत्रण” यामध्ये भाग-भांडवल धारण केल्यामुळे किंवा व्यवस्थापकीय अधिकारामुळे किंवा भागधारकातील करारामुळे किंवा भागिदारी करारामुळे किंवा विश्वस्त करारामुळे किंवा मतदान करारामुळे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे मिळणा-या अधिकारासह, बहुसंख्य संचालकांची नियुक्ति करण्याचा किंवा व्यवस्थापनाचे किंवा वीज व्यापा-याच्या धोरणात्मक निर्णयाचे नियंत्रण करण्याच्या अधिकाराचा समावेश राहील.

खुलासा २ : या विनियमाच्या प्रयोजनार्थ, “भागधारणेतील महत्त्वाचा बदल” म्हणजे वेळोवेळी अंमलांत असलेले भारतीय रोखे व विनिमय मंडळ (SEBI) (मोठ्या प्रमाणावरील भाग खरेदी आणि उद्योग ताब्यांत घेणे (Takeovers) विनियम, १९९७, मधील विनियम ७ मध्ये विहीत केलेल्या अशा व्यक्तीने वीज व्यापा-याच्या इतके टक्के भागांची किंवा मतदानाच्या हक्कांची केलेली खरेदी, ज्याची त्या विनियमाच्या उप-विनियम (१) खाली माहिती उघड करणे भाग पडेल.

१६.३ परवानाप्राप्त उद्योगाच्या कामाकरिता मालमत्तेवर कर्जाचा बोजा चढविण्याशिवाय परवानाप्राप्त उद्योगाच्या मालमत्तेवर इतर कोणत्याही कारणांसाठी कर्जाचा बोजा चढविण्यापूर्वी वीज व्यापारी आयोगाची परवानगी घेईल.

१६.४ वीज व्यापारी, वीज व्यापा-यास परवानाप्राप्त उद्योगासाठी माल व सेवा पुरविण्याकरिता त्याच्या उप-कंपनीची (subsidiary company) किंवा सूत्रधार कंपनीची (holding company) किंवा अशा सूत्रधार कंपनीच्या उप कंपनीची, खालील अटींच्या अधीन राहून, नेमणूक करेल -

(अ) हा व्यवहार, जवळीक बाजूला ठेवून, त्या परिस्थितीत योग्य व वाजवी किंमतीस, ज्याचा या विनियमाच्या प्रयोजनार्थ असा अर्थ आहे की, वीज व्यापा-याशी संबंधित आणि निगडीत नसलेली तिसरी व्यक्ती आणि वीज व्यापारी यांचेमध्ये कोणत्याही विशिष्ट व्यहारासंबधांत अटी व शर्तीनुसार ठरणारी किंमत, केला जाईल.

(ब) वीज व्यापारी, प्रत्येक आर्थिक वर्षांत या विनियमात उल्लेखलेल्या स्वरुपांचा, त्या आर्थिक वर्षांत पार पाडलेल्या व्यवहारांचा तपशील, आयोगास सादर करेल.

(क) वरील खंड (अ) मधील गरजांची पूर्तता झाली असल्याबाबत सनदी लेखापालाचे एक प्रमाणपत्र वीज व्यापारी प्रत्येक आर्थिक वर्षांत आयोगास सादर करेल.

स्पष्टीकरण - या विनियमांच्या प्रयोजनार्थ “उप-कंपनी (subsidiary company)” आणि “सूत्रधार कंपनी (holding company)” या संज्ञांचा अर्थ कंपनी अधिनियम, १९५६ मधील कलम ४ प्रमाणे राहील.

## १७. लेखा

१७.१ वीज व्यापा-याचे आर्थिक वर्ष १ एप्रिल पासून पुढील ३१ मार्च पर्यंत राहील.

१७.२ वीज व्यापारी परवानाप्राप्त उद्योगासंबंधात खालील गोष्टी करेल -

(अ) महसुल, खर्च, मालमत्ता, दायित्त्वे, राखीव निधी आणि तरतुदी या बाबी ज्या परवानाप्राप्त उद्योगाच्या असतील किंवा ज्यांचा त्याच्याशी रास्तपणे संबंध जोडता येईल त्या वीज व्यापा-याच्या पुस्तकांत स्वतंत्रपणे लक्षांत याव्यांत म्हणुन त्यासाठी आवश्यक असतील ते लेखा अभिलेख ठेवेल.

(ब) कंपनी अधिनियम, १९५६ मधील तरतुदींनुसार आणि / किंवा भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या प्रमाणांप्रमाणे किंवा मार्गदर्शनानुसार अशा लेखा अभिलेख्यांवरुन लेखा विवरणपत्रे सातत्याने तयार करेल.

१७.३ वीज व्यापारी त्याच्या लेखा विवरणपत्रांची एक प्रत, कोणत्याही व्यक्तीने लेखी विनंति केल्यास त्यास, फोटोकॉपीहून जास्त खर्च येणार नाही इतक्या किंमतीस, उपलब्ध करुन देईल.

## १८. आयोगास माहिती देण्याची तरतूद

१८.१ वीज व्यापारी त्याच्या परवानाप्राप्त उद्योगाच्या संदर्भात आयोगास गरज असेल त्यानुसार माहिती, कागदपत्रे आणि तपशील आयोगास सादर करेल.

१८.२ वरील विनियम १८.१ ला बाधा येऊ न देता, वीज व्यापा-याची कामगिरी आणि परवान्याच्या अटी व शर्ती, आणि या विनियमांसोबतच्या अनुसूची ३ मधील इतर कोणत्याही वैधानिक किंवा नियामक अटीची पूर्तता झाली आहे किंवा नाही यावर संनियंत्रण ठेवण्यासाठी वीज व्यापारी आयोगास वेळोवेळी माहिती सादर करेल.

परंतु असे की, वरील माहिती राज्य लोड डिस्पॅच सेंटर व त्याची प्रत आयोगास तिमाही तत्त्वावर एप्रिल, जूलै, ऑक्टोबर आणि जानेवारीच्या १० तारखेस अनुक्रमे जानेवारी ते मार्च, एप्रिल ते जून, जूलै ते सप्टेंबर आणि ऑक्टोबर ते डिसेंबर या तिमाहीसाठी पाठविण्यांत येईल आणि माहिती सादर करावयाचा नमूना यथायोग्यरित्या सर्व दृष्टिने पूर्ण असा भरण्यांत येईल आणि कोणताही रकाना मोकळा ठेवण्यांत येणार नाही.

परंतु आणखी असे की, राज्य लोड डिस्पॅच सेंटरला पाठविलेला अहवाल वीज व्यापा-याच्या वेब-साईवर किंवा आयोग प्राधिकृत करेल त्या अन्य कोणत्याही वेब-साईटवर उतरवून (download) घेण्यासाठी तक्त्याच्या नमुन्यामध्ये ठेवण्यांत येईल.

परंतु असेही की, राज्य लोड डिस्पॅच सेंटर अहवालांत नमूद केल्याप्रमाणे व्यापार केल्या गेलेल्या उर्जेच्या परिमाणाची पडताळणी करुन आयोगास एक अहवाल सादर करेल.

## १९. कामगिरीची मानके

१९.१ वीज व्यापा-याशी सल्लामसलत करुन आयोग वीज व्यापार परवानाधारकासाठी किंवा एका वर्गाच्या परवानाधारकांसाठी कामगिरीची मानके विनिर्दिष्ट करेल.

१९.२ वरील विनियम १९.१ ला बाधा येऊ न देता, वीज व्यापारी प्रत्येक वर्षी ३१ मार्च, ३० जून, ३० सप्टेंबर आणि ३१ डिसेंबरला संपणा-या तिमाहींसाठी कामगिरीचा तपशील तिमाही तत्त्वावर या विनियमांसोबतच्या अनुसूची ४ मध्ये विहीत केलेल्या नमुन्याममध्ये पुढील तिमाहीनंतरच्या पहिल्या महिन्यांतील १५ तारखेपर्यंत आयोगास सादर करेल.

## २०. परवाना शुल्क

परवाना अंमलांत असेल त्या कालावधीत किंवा आयोग वाढवेल इतक्या पुढील कालावधीत, आयोग विहीत करेल इतके परवाना शुल्क वीज व्यापारी प्रत्येक वर्षी एप्रिलच्य १० तारखेपर्यंत आयोगास अदा करेल.

## २१. परवान्याच्या अर्थनिश्चितीसंदर्भात निर्णय

परवाना आणि त्यातील अटी व शर्तींची अर्थनिश्चिती आयोग ठरवेल त्याप्रमाणे राहील.

## २२. सुधारणा करण्याचे अधिकार

आयोग़ कोणत्याही वेळी या विनियमांतील कोणत्याही तरतूदीमध्ये बदल, फेरबदल किंवा सुधारणा करु शकेल.

## २३. अडचणी दूर करण्याचे अधिकार

या विनियमांतील कोणत्याही तरतूदीची अंमलबजावणी करताना जर काही अडचणी आल्या तर, अधिनियमांतील तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही तरतूद, जी अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक असेल, आयोग साधारण किंवा विशेष आदेशाने करु शकेल.

अनुसूची १

**परवाना मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमूना**

खाली दिलेल्या नमुन्यामध्ये अर्ज त्यासोबतच्या यादीतील माहिती व कागदपत्रांसह करण्यांत येईल.

**अर्जाचा नमुना**

(सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांना पाठविण्यांत यावा)

मी / आम्ही "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४" ला अनुसरुन याद्वारे वीज व्यापार परवाना मिळण्यासाठी अर्ज करीत आहोत. आम्ही येथे आमच्या अर्जाच्या संदर्भात आवश्यक तपशील देत असून आयोग मागेल ती अन्य कोणतीही माहिती देऊ.

**सर्वसाधारण माहिती**

१. परवान्यांत असणारे नांव

२. प्राथमिक संपर्क

- अ. नांव
- ब. संपर्काचा पत्ता
- क. दूरध्वनी क्रमांक
- ड. फॅक्स क्रमांक
- इ. ई-मेल पत्ता.

**अर्जदारासंबधीची माहिती**

३. संस्थेचे पूर्ण कायदेशीर नांव

४. लागू असलेल्या कायद्याखालील नोंदणी क्रमांक

५. संस्थापनाची (incorporation) आणि नोंदणीची तारीख

६. नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता

**सहपत्रे**

खालील माहिती / कागदपत्रे योग्यरित्या जोडली आहेत :

**संस्थापन**

७. लागू असणरी खालील संस्थापनाची कागदपत्रे -

अ. अर्जदार कंपनी असल्यास, संस्थापन ज्ञापन व संस्थापन नियमावली . (Memorandum of Association and Articles of Association)

ब. अर्जदार भागिदारी संस्था असल्यास, भागिदारीचा करार.

क. इतर कोणत्याही प्रकरणी, लागू असणारा करार किंवा ,असल्यास, संस्थापन सनद (charter) .

८. प्रवर्तकांची नांवे प्रत्येकाच्या मालकीतील टक्केवारीसह

**तांत्रिक माहिती**

९. परवाना मिळाल्यानंतरच्या पहिल्या वर्षात करावयाच्या प्रस्तावित उर्जा व्यापाराचे परिमाण आणि त्यापुढील पांच वर्षाकरिता उर्जा व्यापार योजना.

१०. व्यवस्थापन माहिती (व्यापारी, वाणिज्य, अर्थविषयक, नियामक, मनुष्यबळ आणि माहिती - तंत्रक्षेत्रातील कार्यासंदर्भात)

अ. व्यक्तीचे नांव

ब. अर्जदार संस्थेतील पद

क. अर्हता

ड. नैपुण्याचे (expertise) क्षेत्र

इ. अनुभव

११. अर्जदार परवानाप्राप्त उद्योगास लागणारा निधी पूर्णपणे स्वतःच्या बळावर पुरविणार आहे कां :

अ. असल्यास, अर्जदाराच्या सम भाग भांडवलाची रक्कम व टक्केवारी

ब. नसल्यास, ज्यांच्याकडून भाग भांडवल उभारण्यांत येणार आहे अशा व्यक्तींच्या संबंधात वरील अनुक्रमांक ३ - ८ येथे नमूद केलेल्या अशा भाग भांडवलाची रक्कम आणि टक्केवारी यासह, तपशील.

क. परवानाप्राप्त उद्योगासाठी प्रस्तावित केलेल्या कर्जाचा तपशील

**आर्थिक माहिती**

१२. असल्यास, लेखा परिक्षकाच्या अहवालासह सर्वांत अलिकडची तीन वर्षांची लेखा विवरणपत्रे.

१३. अर्जदाराच्या निव्वळ मत्तेबाबतचे सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र.

**इतर सहपत्रे**

१४. परवाना अर्जावरील प्रक्रिया शुल्काच्या पावतीची प्रत.

मी / आम्ही प्रमाणित करतो की, याद्वारे सादर केलेला तपशील सादर करण्याच्या वेळी माझ्या / आमच्या ज्ञान व विश्वासानुसार सत्य, पूर्ण आणि बरोबर आहे व त्यांत महत्वाच्या वस्तुस्थितीबाबत कोणतेही असत्य विधान नाही व यांत नमूद केलेले विधान / तपशील दिशाभूल करणारा होऊ नये म्हणून आवश्यक असणारी महत्वाची वस्तुस्थिती नमूद करण्याचे वगळण्यांत आलेले नाही.

| | |
|---|---|
| ठिकाण : | सही |
| तारीख : | नांव व पदनाम |
| | मोहोर |

अनुसूची २

## परवान्याचा नमुना

-------------------------------------- ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय ----------- येथे आहे, यांना व्यापाराच्या क्षेत्रांत (या परवान्यांत व्याख्या केल्याप्रमाणे) विजेचा व्यापार करण्यकरिता व याद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या अधिकारांसह आणि अटी व शर्तींवर विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) च्या कलम १४ खाली महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेला परवाना.

**भाग १ : सर्वसाधारण**

**१. संक्षिप्त शिर्षक**

या परवान्याला .................. वीज व्यापार परवाना (.........चा परवाना क्र...) असे म्हणावे.

**२. व्याख्या**

या परवान्यांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर -

(अ) **"लेखा विवरणपत्र"** म्हणजे परवानाप्राप्त उद्योगांकरिता प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता स्वतंत्र तयार केलेली व खालील बाबींचा समावेश असलेली लेखा विवरणपत्रे -

(१) कंपनी अधिनियम, १९५६ च्या अनुसूची ६च्या भाग १ मधील नमुन्याप्रमाणे तयार केलेला ताळे-बंद;

(२) कंपनी अधिनियम, १९५६ च्या अनुसूची ६च्या भाग २ मधील गरजांची पुर्तता करुन तयार केलेले नफा-तोटा पत्रक;

(३) भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या रोकड आवक (cash flow) विवरणपत्रासाठी असलेल्या लेखा प्रमाणांवर (AS-3) आधारित तयार केलेले रोकड आवक विवरणपत्र;

(४) वीज व्यापा-याच्या वैधानिक लेखापरिक्षकाचा अहवाल;

(५) कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम २०९(१)(डी) खाली केंद्र शासनाने विहीत केलेले खर्चाचे अभिलेखे;

यांसह त्यासंबधीच्या टिपण्या, व आयोग वेळोवळी निदेश देईल त्यानुसार इतर सहाय्यक विवरणपत्रे व माहिती.

(ब) **“अधिनियम”** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);

(क ) **“आयोग”** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

(ड) **“परवाना”** म्हणजे हा परवाना ज्याखाली वीज व्यापारी परवानाप्राप्त उद्योग करण्यासाठी प्राधिकृत करण्यांत आला आहे.

इ) **“परवानाप्राप्त उद्योग”** म्हणजे या परवान्यास अनुसरुन करावयाचा विजेच्या व्यापाराचा उद्योग.;

(फ) **“विनियम”** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४;

(ग) **“ वीज व्यापारी ”** म्हणजे ............परवानाप्राप्त उद्योगाचा चालक म्हणून.

यांत आढळणारे शब्द किंवा शब्दप्रयोग आणि ज्यांची व्याख्या करण्यांत आली नाही त्यांना अधिनियमांत नमूद केल्यानुसार अर्थ राहील.

## भाग २ : सर्वसाधारण अटी व शर्ती

### ३. वीज व्यापाराचे क्षेत्र

वीज व्यापाराचे क्षेत्र महाराष्ट्र राज्य असेल.

### ४. परवान्याचा प्रारंभ आणि अटी

परवाना हा .......चा ........दिवस ........ रोजी अंमलांत येईल व जर तो अधिनियमाच्या कलम १९ खाली आयोगाने आधीच रद्द केला नाही तर तो अधिनियमाच्या कलम १५च्या उप-कलम (८) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपर्यंत अंमलांत राहील.

### ५. कर्तव्ये

५.१ वीज व्यापारी अधिनियम आणि त्याखाली करण्यांत आलेले नियम व विनियम यांतील तरतूदींना अनुसरून परवानाप्राप्त उद्योग करेल.

परंतु असे की, वीज व्यापा-याला खालील बाबींची पूर्तता करावी लागेल -

(अ) वीज व्यापारी विजेच्या पारेषणाचा व्यापार करणार नाही.

(ब) अंमलांत असलेल्या व लागू असलेल्या कायद्यातील तरतूदींची व विशेषतः अधिनियमाची आणि त्याखालील नियम व विनियमांची, राज्य ग्रिड संहिता, आयोगाने वेळोवळी दिलेले आदेश आणि निदेश यांची वीज व्यापारी पूर्तता करेल.

(क) वीज व्यापरी जेव्हा त्याच्या व्यापाराचे परिमाण खालच्या वर्गवारीतून वरच्या वर्गवारीत जाईल तेव्हा त्याची निव्वऴ मत्ता तो वाढवेल आणि वर्गवारीतील बदल प्रत्येक वर्षी ३१ मार्च रोजी संपणा-या वर्षांत व्यापा-याने केलेल्या विजेच्या व्यापाराच्या परिमाणाच्या आधारावर ठरविण्यांत येईल आणि वीज व्यापारी एका वर्गवारीतून दुस-या वर्गवारीत जाताना आणि त्या अनुषंगाने त्याच्या निव्वळ मत्तेमधील बदल आयोगास कळवेल.

(ड) आयोगाने जेथे व्यापाराचे मार्जिन निश्चित केले असेल तेथे वीज व्यापा-यास त्याच्या अधीन रहावे लागेल.

(इ) आयोग विहीत करेल त्या तांत्रिक बाबी, पुरेशा भांडवलाबाबतच्या अटी व पत-पात्रता यांचे नियंत्रण वीज व्यापा-यावर राहील आणि जेव्हा व्यापाराचे परिमाण वाढेल तेव्हा तो तांत्रिक आणि कर्मचारीवर्गासह पुरेशा भांडवलाबाबतच्या वाढत्या गरजा पु-या करेल.

(फ) दूरध्वनी, फॅक्स, संगणक, इंटरनेट यासारख्या संपर्क सुविधा व्यापारास सुरुवात करण्यापूर्वी वीज व्यापारी बसवेल.

(ग) प्रादेशिक विद्युत मंडळे किंवा प्रादेशिक उर्जा समित्या, जसे असेल तसे, राज्य लोड डिस्पॅच सेंटर आणि राज्य पारेषण कंपनी यांच्याशी परवानाप्राप्त उद्योगाच्या संदर्भात वीज व्यापारी सुसूत्रता साधेल.

(ह) आयोग प्राधिकृत कोणत्याही व्यक्तीला परवान्याच्या संदर्भात त्याचे कर्तव्य पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य वीज व्यापारी देईल.

(ई) व्यापाराचे सर्व व्यवहार पत-पत्रांद्वारे किंवा व्यापारांत ग्राह्य ठरलेल्या इतर माध्यमांद्वारे करण्यांत येतील.

(ज) वीज व्यापारी, परवानाप्राप्त उद्योग लागोपाठच्या चार तिमाह्या चालविण्याचे टाळणार नाही किंवा त्यांत निष्काळजीपणा करणार नाही.

(त) वीज व्यापारी त्याच्या ग्राहकांची आणि त्याने इतर व्यक्तींबरोबर केलेल्या व्यवहारांची अद्ययावत नोद ठेवेल.

५.२ वीज व्यापारी, जितके व्यवहार्य असेल तितके लवकर, आयोगास कळवेल -

(अ) अधिनियम, त्याखालील नियम आणि विनियम, आयोगाने दिलेले निदेश किंवा आदेश, करार किंवा परवाना यानुसार वीज व्यापा-यावर येणा-या जबाबदा-या पार पाडण्याच्या त्याच्या क्षमतेवर परिणाम करेल असा परिस्थितीतील कोणताही लक्षणीय बदल;

(ब) अधिनियम, त्याखालील नियम आणि विनियम, आयोगाने दिलेले निदेश किंवा आदेश, करार किंवा परवाना यांचा कोणताही महत्वाचा भंग, किंवा त्याची संभाव्य शक्यता, जी त्यास पुरेशी माहित होती, व्यवहार्य असेल तितके लवकर, त्याबाबतच्या कारणांसह; आणि

(क) व्यवस्थापकीय नियंत्राणांतील कोणताही बदल किंवा वीज व्यापा-याच्या भाग-धारणेतील महत्वाचा बदल.

खुलासा १: या विनियमांच्या प्रयोजनार्थ, "व्यवस्थापकीय नियंत्रण" यामध्ये भाग-भांडवल धारण केल्यामुळे किंवा व्यवस्थापकीय अधिकारामुळे किंवा भागधारकातील करारामुळे किंवा भागिदारी करारामुळे किंवा विश्वस्त करारामुळे किंवा मतदान करारामुळे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे मिळणा-या अधिकारासह , बहुसंख्य संचालकांची नियुक्ति करण्याचा किंवा व्यवस्थापनाचे किंवा वीज व्यापा-याच्या धोरणात्मक निर्णयाचे नियंत्रण करण्याच्या अधिकाराचा समावेश राहील.

खुलासा २: या विनियमाच्या प्रयोजनार्थ, "भागधारणेतील महत्त्वाचा बदल" म्हणजे वेळोवेळी अंमलांत असलेले भारतीय रोखे व विनिमय मंडळ (SEBI) (मोठ्या प्रमाणावरील भाग खरेदी आणि उद्योग ताब्यांत घेणे (Takeovers) विनियम, १९९७, मधील विनियम ७ मध्ये विहीत केलेल्या अशा व्यक्तीने वीज व्यापा-याच्या इतके टक्के भागांची किंवा मतदानाच्या हक्कांची केलेली खरेदी, ज्याची त्या विनियमाच्या उप-विनियम (१) खाली माहिती उघड करणे भाग पडेल.

५.३ परवानाप्राप्त उद्योगाच्या कामाकरिता मालमत्तेवर कर्जाचा बोजा चढविण्याशिवाय परवानाप्राप्त उद्योगाच्या मालमत्तेवर इतर कोणत्याही कारणांसाठी कर्जाचा बोजा चढविण्यापूर्वी वीज व्यापारी आयोगाची परवानगी घेईल.

५.४ वीज व्यापारी, वीज व्यापा-यास परवानाप्राप्त उद्योगासाठी माल व सेवा पुरविण्याकरिता त्याच्या उप कंपनीची (subsidiary company) किंवा सूत्रधार कंपनीची (holding company) किंवा अशा सूत्रधार कंपनीच्या उप कंपनीची, खालील अटींच्या अधीन राहून, नेमणूक करेल -

(अ) हा व्यवहार, जवळीक बाजूला ठेवून, त्या परिस्थितीत योग्य व वाजवी किंमतीस, ज्याचा या विनियमाच्या प्रयोजनार्थ असा अर्थ आहे की, वीज व्यापा-याशी संबंधित आणि निगडीत नसलेली तिसरी व्यक्ती आणि वीज व्यापारी यांचेमध्ये कोणत्याही विशिष्ट व्यहारासंबधांत अटी / व शर्तीनुसार ठरणारी किंमत, केला जाईल.

(ब) वीज व्यापारी, प्रत्येक आर्थिक वर्षांत या विनियमात उल्लेखलेल्या स्वरुपांचा, त्या आर्थिक वर्षात पार पाडलेल्या व्यवहारांचा तपशील, आयोगास सादर करेल.

(क) वरील खंड (अ) मधील गरजांची पूर्तता झाली असल्याबाबत सनदी लेखापालाचे एक प्रमाणपत्र वीज व्यापारी प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता आयोगास सादर करेल.

स्पष्टीकरण - या विनियमांच्या प्रयोजनार्थ "उप-कंपनी (subsidiary company)" आणि "सूत्रधार कंपनी (holding company)" या संज्ञांचा अर्थ कंपनी अधिनियम, १९५६ मधील कलम ४ प्रमाणे राहील.

## ६. लेखा

६.१ वीज व्यापा-याचे आर्थिक वर्ष १ एप्रिल पासून पुढील ३१ मार्चपर्यंत राहील.

६.२ वीज व्यापारी परवानाप्राप्त उद्योगासाठी खालील बाबी करेल -

(अ) महसुल, खर्च, मालमत्ता, दायित्वे, राखीव निधी आणि तरतुदी या बाबी ज्या परवानाप्राप्त उद्योगाच्या असतील किंवा ज्यांचा त्याच्याशी रास्तपणे संबंध जोडता येईल त्या वीज व्यापा-याच्या पुस्तकांत स्वतंत्रपणे लक्षांत याव्यांत म्हणुन त्यासाठी आवश्यक असतील ते लेखा अभिलेख ठेवेल.

(ब) कंपनी अधिनियम, १९५६ मधील तरतुदींनुसार आणि / किंवा भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या प्रमाणांप्रमाणे किंवा मार्गदर्शनानुसार लेखा अभिलेख्यांवरुन लेखा विवरणपत्रे सातत्याने तयार करेल.

६.२ वीज व्यापारी त्याच्या लेखा विवरणपत्राची एक प्रत, कोणत्याही व्यक्तीने लेखी विनंती केल्यास त्यास, फोटोकॉपीहून जास्त खर्च येणार नाही इतक्या रास्त किंमतीस, उपलब्ध करुन देईल.

## ७. आयोगास माहिती देण्याची तरतूद

वीज व्यापारी त्याच्या परवानाप्राप्त उद्योगाच्या संदर्भांत आयोगास गरज असेल त्यानुसार माहिती, कागदपत्रे आणि तपशील आयोगास सादर करेल.

## ८. कामगिरीची मानके

आयोग विहीत करेल त्या कालावधीकरिता आणि त्या नमुन्यामध्ये वीज व्यापारी त्याच्या कामगिरीचा तपशील आयोगास सादर करेल.

## ९. परवाना शुल्क

परवाना अंमलांत असेल त्या कालावधीत किंवा आयोग वाढवेल इतक्या पुढील कालावधीत, आयोग विहीत करेल इतके परवाना शुल्क वीज व्यापारी दरवर्षी एप्रिलच्या १० तारखेपर्यंत आयोगास अदा करेल.

## १०. परवान्याच्या अर्थनिश्चितीसंदर्भात निर्णय

परवाना आणि त्यातील अटी व शर्तींची अर्थनिश्चिती आयोग ठरवेल त्याप्रमाणे राहील.

# भाग ३: विशिष्ट अटी व शर्ती

अनुसूची ३

**तिमाही माहिती सादर करावयाचे प्रपत्र**

**(समजा जूलै २००४ ते सप्टेंबर, २००४)**

वीज व्यापा-याचे नांव :

परवान्याचा तपशील :

| अनुक्रमांक | व्यापाराचे परिमाण दशलक्ष kWh मध्ये | कोणा कडून खरेदी केली * | कोणाला विकली * | खरेदीचा बिंदू | खरेदीची किंमत | विक्रीचा बिंदू | विक्रीची किंमत | खरेदीदार / विक्रेता / व्यापायाने भरलेला पारेषण / वहन आकार | खरेदीदार / विक्रेता / व्यापा-याने सहन केलेला पारेषण तोटा | खरेदीदार / विक्रेता / यांनी भरलेला UI आकार | व्यापारा साठी मार्जिन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |

टीप : सर्व व्यवहार त्यांची एकत्र बेरीज न दाखविता व्यवहार-निहाय वेगवेगळे दाखवावेत

* खरेदीदार / विक्रेता यांच्या नांवाशिवाय, खरेदीदार / विक्रेता यांची वर्गवारी म्हणजे वीज उत्पादक, निजी वापराचा वीज निर्मिती प्रकल्प, वितरण परवानाधारक, शासन, ग्राहक ( लागू असेल तेव्हा) इ. दाखवावी.

** लागू नसेल ते खोडावे

अनुसूची ४

## वीज व्यापा-याच्या कामगिरीच्या मानकांसाठी सादर करावयाचे प्रपत्र

## (आयोग आणि राज्य लोड डिस्पॅच सेंटरला सादर करावयाचे)

वीज व्यापा-याचे नांव :

परवान्याचा तपशील :

| अनुक्रमांक | तिमाहीतील व्यापाराचे परिमाण | चालू तिमाही-पर्यंतचा एकूण व्यापार | व्यापा-याच्या वर्गवारीत काही बदल झाला आहे कां | वर्गवारीत बदल झाल्यामुळे निव्वळ मत्तांमध्ये वाढ केली आहे कां | लागू असलेले परवाना शुल्क आयोगाकडे भरणा करण्यांत आले आहे कां | परवान्याच्या अटींचा कोणताही भंग झाल्याचे कोणत्याही अभिकर्त्याने निदर्शनास आणले होते किंवा वीज व्यापा-याच्या लक्षांत आले होते कां | व्यापारासाठी खरेदी केलेल्या उर्जेची किंमत प्रदान करण्यासंबंधीचा पूर्वेतिहास | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |

टीपः- (१) यथायोग्यरितीने भरलेल्या अनुसूची ४ ची एक प्रत आयोग़ास देखील परस्पर सादर करण्यांत येईल.

(२) रालोडिसे व्यापाराच्या परिमाणाची पडताळणी करेल व पडताळणी केलेल्या अनुसूची ४ ची एक प्रत आयोगास पाठवेल.

**मुंबईः**
दिनांकः १० जून, २००४.

**ए. एम. खान,**
सचिव.
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई